सिधुदुर्ग पर्यटन विकास महामंडळ
स्थापन करणे बाबत.

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग (पर्यटन),
शासन निर्णय क्र.एमटीसी-0699/प्र.क्र.403/पर्यटन
मंत्रालय, मुंबई-400 032,
दिनांक : 9 जुलै, 1999

वाचा : शासन निर्णय, गृह विभाग (पर्यटन) क्र. एमटीसी-1097/प्र.क्र.852
पर्यटन दि.26 ऑगस्ट, 1997

शासन निर्णय : निसर्गसौंदर्यामुळे सिधुदुर्ग साहजिकच एक आकर्षक पर्यटन जिल्हा बनू शकेल आणि त्याप्रमाणे या जिल्ह्यात पर्यटनाच्या विकास करण्यासाठी एक विशेष संधी [illegible] ...च्या पुरेपूर फायदा घेण्याच्या उद्देशाने सिधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटनाच्या दृष्टीने सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने सिधुदुर्ग जिल्हा हा "पर्यटन जिल्हा" म्हणून घोषित केलेला आहे. सिधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटन विषयक सेवा-सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार व्हावा म्हणून सिधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटन विकासासाठी महामंडळ स्थापनेची बाब शासनाच्या विचाराधीन होती. विचाराअंती शासन या शासन निर्णयाद्वारे सिधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटनदृष्ट्या विकास होण्याच्या उद्देशाने एक स्वतंत्र सिधुदुर्ग पर्यटन विकास महामंडळ स्थापन करण्यास मान्यता देत आहे. सदर महामंडळाचे भागभांडवल, कार्ये, महामंडळाच्या संचालक मंडळाची रचना, कर्मचारी वर्ग इत्यादी बाबतीत शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे :-

1. सिधुदुर्ग पर्यटन विकास महामंडळाचे नोंदणीकृत कार्यालय मुंबई येथे व प्रशासकीय कार्यालय सिधुदुर्ग नगरी येथे राहील.
2. सदर महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु.1,00 कोटी असेल.
3. सदर महामंडळाची भारतीय कंपनी कायदा 1956 नुसार नोंदणी करण्यात यावी.

शासनाने पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटनाचा विकास व्हावा या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी. विकास आराखड्याची अंमलबजावणी करावी. तसेच या जिल्ह्याच्या विकासासाठी अर्थसंकल्पित तरतूदी, केंद्रीय अनुदान, परकीय अर्थ सहाय्य व इतर वित्तीय संस्थांकडून निधी उपलब्ध करून घेणे

5. सदर महामंडळाच्या संचालक मंडळाची रचना खालील प्रमाणे असेल -

1. मुख्यमंत्री	अध्यक्ष
2. मंत्री (पर्यटन)	उपाध्यक्ष
3. मुख्य सचिव	संचालक
4. सचिव (पर्यटन) किंवा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ	संचालक
5. आयुक्त, कोकण विभाग	संचालक
6. जिल्हाधिकारी (सिंधुदुर्ग)	संचालक
7. उप-संचालक (नगर रचना)	संचालक
8. पर्यावरण क्षेत्रामधील 1 तज्ञ व्यक्ती	संचालक
9. पर्यटन क्षेत्रामधील 1 तज्ञ व्यक्ती	संचालक
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ	व्यवस्थापकीय संचालक

6. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने त्यांच्याकडे सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये असलेली मालमत्ता सिंधुदुर्ग पर्यटन विकास महामंडळाकडे पुस्तकी किंमतीनुसार सहभाग म्हणून हस्तांतरीत करावी. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील पर्यटन विकास योजनांसाठी केंद्र शासनाकडून मंजूर झालेल्या व होणा-या योजनांसाठी मिळणारे अर्थसहाय्य सदर महामंडळाकडे सुपूर्द करण्यात यावे.

7. सिंधुदुर्ग पर्यटन विकास महामंडळास लागणारा आवश्यक तो अधिकारी/कर्मचारी वृंद महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून वर्ग करण्यात यावा. तसेच उपजिल्हाधिकारी, तहसिलदार व [illegible] अधिकारी श्रेणीतील एकूण 5 पदे मंजूर करून ती नवीन महामंडळामध्ये प्रतिनियुक्तीने भरण्यात यावीत.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने त्यांच्याकडे असलेली काही पदे प्रत्यार्पित [illegible] सिंधुदुर्ग पर्यटन विकास महामंडळासाठी नवीन पदे निर्माण करण्यात यावीत.

9. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळात सध्या कार्यरत असलेली सहव्यवस्थापकीय संचालक हे पद सिंधुदुर्ग पर्यटन विकास महामंडळाकडे वर्ग करावे व त्या पदाचे व्यवस्थापकीय संचालक सिंधुदुर्ग पर्यटन विकास महामंडळ असे पदनाम निश्चित करण्यात यावे.

10. सिंधुदुर्ग पर्यटन विकास महामंडळास भागभांडवल देण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासासाठी वार्षिक योजना 1999-2000 मध्ये असलेल्या रु.65.00 लाख नियतव्यय व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला भागभांडवलासाठी राखून ठेवलेला रु.60.00 लाख नियतव्ययाचा काही भाग सदर महामंडळाच्या भागभांडवलासाठी वापरण्यात [illegible]

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(ए. रामकृष्णन्)
सचिव (पर्यटन), गृह विभाग
महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राज भवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्य मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्री, मंत्रालय, मुंबई.
सर्व राज्य मंत्री, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मंत्रालयीन विभागांचे सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव . मंत्रालय, मुंबई.
शासनाचे पर्यटन विषयक सल्लागार, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
महासंचालक, पर्यटन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
महालेखाकार, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई.
निवासी लेखाधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषाधिकारी, सिंधुदुर्ग.
भारत सरकार पर्यटक कार्यालय, मुंबई.
फेडरेशन ऑफ हॉटेल एन्ड रेस्टॉरंट असोसिएशन (W.I.), मुंबई.
सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
निवड नस्ती, कार्यासन/पर्यटन.
